जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त रत्नागिरी (मु.) चिपळूण यांचे कार्यालय
दुरध्वनी क्र.०२३५५-२५६१०७
ई-मेल आयडी - ddcahratnagiri@gmail.com

## रत्नागिरी जिल्ह्यामध्ये गोवर्धन गोवंश सेवा केंद्राची स्थापना करुन गोवंश वाढविणे

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त रत्नागिरी (मु.) चिपळूण, जिल्हा- रत्नागिरी या कार्यालया अंतर्गत राज्यस्तरीय योजने अंतर्गत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही योजना राबविणेबाबत शासन निर्णय क्रमांक/पविआ-१०१८/प्र.क्र.३२/पदुम-३ या शासननिर्णयाने राज्यस्तरीय योजनेअंतर्गत **गोवर्धन गोवंश सेवा केंद्र** ही नवीन योजना राबविण्यासाठी दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मंत्रिमंडळाने मान्यता दिलेलीअ आहे. त्यानुसार शासन निर्णय क्रमांक/पविआ-१०१८/प्र.क्र.३२/पदुम-३, दिनांक ८ मार्च, २०१९ चे सहपत्राने परिशिष्ट-अ अंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील गोवंर्धन गोवंश सेवा केंद्र या योजनेअंतर्गत निवडीसाठी पात्र तसेच निवड करावयाच्या महसुली विभागातील उपविभागांचा जिल्हानिहाय तपशिल देण्यात आला असून उपविभागीय अधिकारी १) रत्नागिरी, २) राजापूर, ३) खेड, ४) दापोली या उपविभागांमधून गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजनेअंतर्गत प्रत्येकी १ प्रमाणे गोशाळेकरिता प्रस्ताव मार्गविणेत येत आहेत.

**गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेचे उद्येश :-**

**(अ) मुलभूत उद्येश :-**

१) दुग्धोत्पादनास, शेतीकामास, पशु-पैदाशीस, ओझी वाहण्याच्या कामास उपयुक्त नसलेल्या/असलेल्या गाय, वळू, बैल व वय झालेले गोवंश यांचा संभाळ करणे.

२) अशा पशुधनासाठी चारा, पाणी व निवा-याची सोय उपलब्ध करुन देणे.

३) गोवर्धन गोवंश सेवा केंद्रामधील पशुधनासाठी आवश्यक असलेल्या वैरणीसाठी वैरण उत्पादन कार्यक्रम राबविणे.

४) गोमूत्र, शेण, इ. पासून विविध उत्पादने, खत, गोबरगॅस व इतर उप-पदार्थांच्या निर्मितीस प्रोत्साहन/चालना देणे.

**(ब) विविध विभागाच्या/संस्थांच्या सहकार्याने पशुसंवर्धन विषयक उपक्रम राबविणे :-**

१) राज्याच्या पशुपैदाशीच्या प्रचलीत धोरणानुसार देशी गायीच्या जातीचे संवर्धन व त्यांच्या संख्येत वाढ होण्याकरिता, संस्थेकडील देशी तसेच गावठी गायींमध्ये शुद्ध देशी गायीच्या जातीच्या वळूचे वीर्य वापरुन कृत्रिम रेतन करुन घेण्यात यावे.

२) वरीलप्रमाणे कृत्रिम रेतनाने पैदास झालेली नर-वासरे महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या मागणीनुसार गोठीत रेतन प्रयोगशाळेसाठी नाममात्र दराने उपलब्ध करुन देण्यात यावीत.

३) वरीलप्रमाणे कृत्रिम रेतनाने पैदास झालेली नर-वासरे व कालवडी यांची मागणीप्रमाणे शेतक-यांना विक्री करण्यात यावी.

४) संस्थेमधील पशुधनामध्ये आंतरपैदास झाल्यास निर्माण होणा-या नर-वासरे/ कालवडी यांची वाढ खुंटणे, कालवडी उशिरा माजावर येणे, वेळीच गर्भधारणा न होणे, गर्भपात होणे, इ. विपरीत परिणाम होऊ शकतात. हे टाळण्यासाठी संस्थेमधील वळूंचे खच्चीकरण करण्यात यावे.

५) संस्थेने प्राप्त अनुदानाच्या खर्चाचे स्वतंत्र हिशोब ठेवावेत व सनदी लेखापालाच्या प्रमाणपत्रासह आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावेत.

६) महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाद्वारे दुग्धव्यवसाय विभाग, स्वयंसेवी संस्था, सहकारी दूध संघ, पशुपैदासकाराच्या संघटना आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्याशी समन्वय ठेवून त्यांचा सक्रिय सहभाग मिळवणे.

Dist. Dy. Commissioner A.H. Ratnagiri (Hq. Chiplun)



Scanned by CamScanner

(क) लाभार्थी निवडीचे निकष / अटी व शर्ती :-

१) सदरची संस्था धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असावी.

२) संस्थेस गोवंश संगोपनाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असावा.

३) केंद्रावर असलेल्या पशुधनास आवश्यक असलेली वैरण/चारा उत्पादनासाठी तसेच पशुधन संगोपनासाठी संस्थेकडे स्वत:च्या मालकीची अथवा ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावरची किमान ०५ एकर जमीन असावी.

४) संस्थेने या योजनेअंतर्गत मागणी केलेल्या एकूण अनुदानाच्या कमीत कमी १० टक्के एवढे खेळते भाग-भांडवल संस्थेकडे असणे आवश्यक आहे.

५) संस्थेचे नजीकच्या मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण झालेले असणे आवश्यक आहे.

६) संस्थेचे गोसेवा / गो पालनाचे कार्य करण्यासाठी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यासोबत करारनामा करण्याचे बंधनकारक राहील.

७) संबंधित संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

८) संस्थेवर कार्यरत कर्मचारी / मजूर यांचे वेतन इत्यादीचा खर्च संस्थेकडून अदा करण्यासाठी संस्था आर्थिक दृष्ट्या सक्षम असावी.

९) या योजनेअंतर्गत ज्या बाबीसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल, त्याच बाबीसाठी भविष्यात नव्याने कोणतेही अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१०) ज्या संस्थांकडे पशुधनाच्या देखभालीसाठी व चा-यासाठी स्वत:च्या उत्पन्नाचे साधन आहे, अशा संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

११) प्रशासकीय विभागाची पुर्वपरवानगी घेऊन, केवळ मूलभूत सुविधा निर्माण करण्याकरिताच, रु.२५.००/- लक्ष इतके अनुदान अनुज्ञेय राहील. सदर अनुदानापैकी पहिल्या टप्प्यामध्ये रु.१५.००/- लक्ष व दुस-या टप्प्यामध्ये रु.१०.००/- लक्ष असे वितरीत करण्यात येईल.

१२) प्रशासकीय विभागाची पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय मूलभूत सुविधा निर्माण केल्यास, अश्या बाबींसाठी सदर योजनेत अनुदान मंजूर करण्यात येणार नाही.

वरील अटी व शर्ती यांची पुर्तता करणा-या गोवर्धन गोवंश सेवा केंद्रानी, पात्रतेसाठी प्रस्ताव ३ प्रतीत ४५ दिवसामध्ये जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, जि.रत्नागिरी, (मु.) चिपळूण यांचेकडे कार्यालयीन वेळेत सादर करावे. शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांच्या जिल्ह्यामध्ये गुणात्मक व संख्यात्मक पशु गोवंश वाढीकरीता लाभ घेणेकरीता शासनाच्यावतीने जाहिर करण्यात येत आहे.

Dist. Dy. Commissioner A.H. Ratnagiri (Hq. Chiplun)

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
रत्नागिरी (मु.) चिपळूण